दि. १८/०५/२०२३

पुण्य नगरी पा.क्र. १

# काँग्रेसची एक 'हाती' सत्ता !

## ■ कर्नाटकात कमळ कोमेजले ■ किंगमेकर होण्याचे जेडीएसचे स्वप्न भंगले

■ बंगळुरू : कर्नाटक विधानसभा निवडणुकीचा शनिवारी निकाल लागला अन् सत्तेविरोधी लाटेत दक्षिण भारतातील भाजपचा एकमेव गड अखेर ढासळला. घोडेबाजार टाळण्यासाठी स्पष्ट बहुमत देण्याच्या काँग्रेसच्या आवाहनाला कर्नाटकच्या मतदारांनी सकारात्मक प्रतिसाद देत या पक्षाला १३६ जागांसह एकहाती सत्ता दिली. तर भाजपच्या पारड्यात अवघ्या ६५ जागा पडल्या.

यासोबतच दर पाच वर्षांनी सत्तांतर करण्याची गत ३८ वर्षांपासूनची अलिखित परंपरा कानडी जनतेने यंदाही अबाधित राखली. त्रिशंकू विधानसभा अस्तित्वात आली तर किंगमेकर होण्याची स्वप्ने बघणाऱ्या जेडीएसला अवघ्या १९ जागांवर समाधान मानावे लागले. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कर्नाटकचा निकाल काँग्रेससाठी नवसंजीवनी ठरला आहे, तर भाजपला आत्मपरीक्षण करून दक्षिण भारतासाठी नव्याने मोर्चेबांधणी करावी लागणार आहे.

कर्नाटक २४४ सदस्यीय विधानसभेसाठी शनिवारी मतमोजणी पार पडली. काँग्रेसने सुरुवातीपासूनच घेतलेली मतांची आघाडी अखेरपर्यंत कायम ठेवली. या निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या लोकप्रियतेवर स्वार होत कर्नाटक जिंकण्याची भाजपची रणनीती होती. त्यासाठी मोदींच्या मॅरेथॉन प्रचारसभा आणि मेगा रोड शो आयोजित करण्यात आले होते. भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्र्यांनाही प्रचारात ▸▸ पान ९ वर....



कौल कर्नाटकचा! विशेष पान...२,४




### आता कसोटी मुख्यमंत्री निवडीची

कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर मुख्यमंत्रीपदी सिद्धरामय्या की डी. के. शिवकुमार यापैकी कोणाची वर्णी लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. संपूर्ण निवडणुकीत दोन्ही दिग्गज नेत्यांनी ताकद पणाला लावली. प्रत्येक मतदारसंघ पिंजून काढत त्यांनी काँग्रेसला विजयी केले. जनता परिवारातून बाहेर पडत २००६ साली काँग्रेसमध्ये प्रवेश करणारे ७५ वर्षीय सिद्धरामय्या हे मुख्यमंत्रीपदाचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. पण काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवकुमार यांचे योगदान महत्वाचे ठरले आहे. त्यामुळे त्यांना मुख्यमंत्री बनवण्यासाठी एक गट इच्छुक आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षश्रेष्ठी सिद्धरामय्या व शिवकुमार यापैकी कोणावर मेहेरबान होणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

पुण्य नगरी पु. पा. क्र. १

# प्रवचनातून चोरलेले ५० लाखांचे दागिने हस्तगत

## पोलिसांच्या कामगिरीमुळे नागरिकांना मिळाले समाधान, ८ आरोपींना अटक

■ मीरा रोड : मीरा रोड येथे धीरेंद्र शास्त्री यांच्या प्रवचन कार्यक्रमात चोरी झालेले (८२८ ग्रॅम) ५० लाखांचे सोन्याचे दागिने गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा व मीरा रोड पोलीस ठाणे यांनी हस्तगत करून चोरी करणाऱ्या आठ आरोपींना अटक करण्यात आली. हस्तगत केलेले दागिने पोलिसांनी नागरिकांना परत केले.



मीरा रोड येथे १८, १९ मार्च २०२३ रोजी बागेश्वर धामवाले बाबांच्या कार्यक्रमासाठी आलेल्या भाविकांमधून ६० महिला व १ पुरुष यांच्या गळ्यातील सुमारे ९९० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरी केले होते. त्याबाबत पोलीस ठाण्यात ४ गुन्हे दाखल करण्यात आले होते. गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा व मीरा रोड पोलीस ठाणे यांनी या गुन्ह्यांचा तपास करून आरोपींना राजस्थानमधील भरतपूर व अलवर जिल्ह्यातून अटक केली. यामध्ये महिला व पुरुष यांचा समावेश असून आरोपी हे सराईत दरोडे, जबरी चोरीसारखे गुन्हे करणारे आहेत. यासाठी पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी गुन्हे शाखा १, काशिमीरा आणि मीरा रोड पोलीस ठाणे यांची ४ विशेष पोलीस पथके तयार केली होती. ही विशेष पथके ३० दिवस भरतपूर, अलवर जिल्ह्यात राहून जोखिम पत्करून स्थानिक पोलिसांच्या सहकार्याने आरोपी गीतादेवी सरदार सिंग, सेतू करमबीर सिंग, अर्जुन सिंग बीरेंद्र बावरिया, हेमा ऊर्फ हिरोदेवी सूरज, पिंकी सूर्यप्रताप सिंग ऊर्फ राहुल, राह खेरथल, रेश्मा हिराराम बावरिया ऊर्फ संत्रा बिरेंदर बावरिया, सोनिया अनिल कुम्हार, रणजितकुमार ऊर्फ प्रवीणकुमार जगदीश प्रसाद बावरिया यांना ताब्यात घेऊन केलेल्या तपासामध्ये या आरोपींचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना अटक केली. त्यांच्याकडून गुन्ह्यात चोरी केलले ५० लाख रुपये किमतीचे ८२८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व लगडी असा मुद्देमाल हस्तगत करून मीरा रोड पोलीस ठाणे परिसरात प्रवचन कार्यक्रमादरम्यान घडलेल्या जबरी चोरीचे सर्व गुन्हे उघडकीस आणले आहेत. हस्तगत केलेला मुद्देमाल मीरा रोड येथे शुक्रवारी झालेल्या मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रमादरम्यान मधुकर पांडे, पोलीस आयुक्त यांच्या हस्ते नागरिकांना परत देण्यात आले.

CamScanner

CamScanner

दि. १४/०५/२०२३

पुण्य नगरी पु.पा.नं. ४

# खून प्रकरणातील आरोपी पाच वर्षांनी जेरबंद

**नालासोपारा :** तामिळनाडूतील चेन्नई शहरातून मित्राचा खून करून पळून गेलेल्या फरारी आरोपीस ५ वर्षांनंतर अटक करण्यात वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश आले आहे.



तामिळनाडूतील चेन्नईस्थित तम्बरम शहरातील टी १९ कलमबक्कम पोलीस ठाण्यातील दाखल गुन्ह्यातील संशयित आरोपी रघू दूधई मंडळ (रा. बिहार) याचा तामिळनाडू पोलीस मागील ५ वर्षांपासून सातत्याने शोध घेत होते. पोलिसांना अनेक वेळा बिहारमध्ये शोधमोहिम राबवली. परंतु तामिळनाडू पोलिसांना त्याला पकडण्यात यश येत नव्हते. ११ मे रोजी तामिळनाडूचे पोलीस पथक मंडळ यांच्या शोधार्थ वालीव पोलीस ठाण्यात दाखल झाले. पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदारांनी मंडळ याचा शोध घेण्याच्या अनुषंगाने तामिळनाडू पोलिसांकडून माहिती मिळवली तसेच वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदारांनी कौशल्याने माहिती मिळवली. मंडल हा वसई पूर्वस्थित बफिंग कंपनीमध्ये काम करत असल्याची माहिती प्राप्त केली. तद्नंतर, स्वतःच्या मित्राच्या खून प्रकरणी मंडल यास वालीव पोलिसांनी यशस्वीपणे ताब्यात घेतले. तपासात आरोपी रघु मंडल व त्याचा मित्र अनिल चौधरी असे दोघे तम्बरम शहरातील टी १९ केलमबक्कम पोलीस ठाण्याच्या कार्यकक्षेत बकिंग कंपनीत एकत्र काम करून एकाच रुममध्ये वास्तव्यास होते. परंतु कालांतराने मंडल व त्याचा मित्र अनिल चौधरी दोघांमध्ये किरकोळ कारणांवरून वाद होऊन त्यांचे आपसात भांडण झाले. या भांडणाचा मंडलने मनात राग धरून १४ सप्टेंबर, २०१८ रोजी अनिल चौधरी हा मंडल सोबत रात्रीचे वेळी एकाच रुममध्ये झोपलेला असताना मंडलने त्याचा मित्र अनिल चौधरी याचा धारदार चाकूने गळा कापून खून केला होता.

म.टा. पा. नं. १

# 'अपात्रतेचा निर्णय कालमर्यादेत अशक्य'

**विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांची स्पष्टोक्ती**

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय कालमर्यादेत घ्यावा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले असताना, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मात्र असा निर्णय निश्चित कालमर्यादेत घेणे अशक्य असल्याचे स्पष्ट केले आहे.

लंडनच्या दौऱ्यावर असलेल्या नार्वेकर यांनी वृत्तसंस्थेशी या विषयाबाबत भाष्य केले. 'शिवसेना आमदारांच्या अपात्रतेबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याचा माझा प्रयत्न आहे. मात्र यासाठी कालमर्यादा निश्चित करणे अशक्य आहे. माझ्यासमोर अनेक अर्ज आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे व्हिप कोणत्या राजकीय पक्षाने बजावायचा यावर अद्याप स्पष्टता यायची आहे', याकडे विधानसभाध्यक्ष नार्वेकर यांनी लक्ष वेधले. 'सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे मी स्वागत करतो. विधिमंडळ राजकीय पक्षाला मान्यता देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाने विधानसभाध्यक्षांना दिला आहे. मी सर्व पक्षकारांना यासंदर्भात म्हणणे मांडण्याची संधी देईन', अशी ग्वाही त्यांनी दिली. 'सर्वोच्च न्यायालयाकडून आमदारांच्या अपात्रतेचा मुद्दा विधानसभाध्यक्षांकडे सोपवण्यात आला आहे. मी यापूर्वीच याबाबत वारंवार भूमिका मांडली आहे. आमदारांना अपात्र ठरवण्याची कार्यकक्षा न्यायालय नसून, विधिमंडळाकडे आहे. त्यावर न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. याबाबत सर्वच बाजूंची पडताळणी करण्यात येईल.'

सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकार पुनर्स्थापित करण्यास नकार देत शिंदे सरकारपुढील टांगती तलवार दूर केली होती. याचवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या (शिंदे गट) १६ आमदारांच्या अपात्रतेची उद्धव ठाकरे गटाची मागणी न्यायालयाने अमान्य केली होती व यासंदर्भात विधानसभा अध्यक्षांनीच निर्णय घ्यावा, असे स्पष्ट केले होते. यानुसार आता आमदारांच्या अपात्रतेवर विधानसभाध्यक्षच निर्णय घेणार आहेत. त्याचवेळी शिवसेनेचे व्हिप भरत गोगावले यांची नियुक्ती बेकायदा ठरवल्याने शिवसेना आता नव्याने कुणाची नियुक्ती करणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे.

सकाळ पा. नं. १

# घुसखोरीचा प्रयत्न लष्कराने हाणून पाडला

**श्रीनगर, ता. १३ : (पीटीआय) :** काश्मीरमध्ये होणाऱ्या जी-२० परिषदेमध्ये अडथळे निर्माण करण्याच्या हेतूने पाकिस्तानी दहशतवाद्यांचा भारतात घुसखोरी करण्याचा प्रयत्न भारतीय जवानांनी उधळून लावल्याची माहिती शनिवारी लष्कराच्या वतीने देण्यात आली.

उत्तर काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यातील उरी येथील नियंत्रण रेषेवरून शनिवारी सकाळी काही दहशतवाद्यांनी भारतात घुसण्याचा प्रयत्न केला; मात्र नियंत्रणरेषेवर तैनात असलेल्या लष्कराच्या जवानांनी हा प्रयत्न हाणून पाडला. या वेळी दहशतवाद्यांना घुसखोरी करताना मदत व्हावी यासाठी, पाकिस्तानच्या सैन्याने भारतीय सीमेमध्ये क्वाडकॉप्टरदेखील घुसविण्याचा प्रयत्न केला. मात्र भारतीय लष्कराच्या वतीने हा प्रयत्नदेखील हाणून पाडण्यात आला.

'जी-२० परिषदेमध्ये अडथळे निर्माण करण्याचा पाकिस्तानचा आणखी एक प्रयत्न आम्ही निष्फळ केला आहे,' असे लष्कराच्या वतीने सांगण्यात आले.

दरम्यान, सुरक्षिततेच्या दृष्टीने या परिसरात लष्कराच्या वतीने शोधमोहीम राबविण्यात येत असल्याचेही लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

CamScanner

दि. १४/०५/२०२३

सकाळ पु. पा. नं. ३

# आगामी निवडणुकांच्या तयारीला लागा

## मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा वसईतील पदाधिकाऱ्यांना आदेश

नालासोपारा, ता. १३ (बातमीदार) : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वसई, विरारमधील शुक्रवारच्या (ता. १२) दौऱ्याने वसई तालुक्यातील मनसे कार्यकर्त्यांत नवचैतन्य पसरले आहे. पालघर दौऱ्यात राज ठाकरे यांनी दुपारच्या वेळी नालासोपारा पूर्वेतील रेजन्सी हॉलमध्ये मनसे नालासोपारा, वसई, बोईसर विधानसभा पदाधिकारी यांच्याशी संवाद साधला. पक्ष संघटना मजबुतीसाठी काम करावे, पक्ष कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्यात समन्वय साधून येणाऱ्या महापालिका, विधानसभा, लोकसभा निवडणुकीच्या तयारीला लागा, असे आदेशच देण्यात आले आहेत.

पक्ष स्थापनेपासून पहिल्यांदाच राज ठाकरे यांनी वसई, विरार, नालासोपाऱ्यातील पदाधिकारी यांच्याशी थेट सवांद साधल्याने मनसे कार्यकर्त्यांत आनंदाचे वातावरण पसरले आहे. दिवसभराच्या दौऱ्यात पदाधिकारी यांच्याशी संवाद साधून, वसई तालुका अध्यक्ष प्रफुल ठाकूर यांच्या नाला येथील मध्यवर्ती कार्यालयाचे त्यांच्या हस्ते रात्री उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर वसई विरार शहराध्यक्ष प्रवीण भोईर यांच्या कार्यालयाला भेट देण्यात आली. नालासोपाऱ्यात मनसे कार्यकर्त्यांनी पेल्हार फाटा ते वसईपर्यंत मोटारसायकल रॅली काढून त्यांचे जंगी स्वागत केले. त्यानंतर रात्री त्यांचा मुक्काम वसईच्या हॉटेलवरच होता.



**वसई :** राज ठाकरे यांची प्रतिमा कॅमेऱ्यात टिपण्यासाठी मनसैनिकांनी गराडा घातला होता.

सकाळ पा. नं. ५

# शेकडो घरांवर टांगती तलवार

## तीस दिवसांत कागदपत्रे सादर करण्याचे उत्तनवासीयांना आदेश

भाईंदर, ता. १३ (बातमीदार) : उत्तन येथील चौक, डोंगरी, पाटे बंदर, तसेच धावगी येथील सरकारी, तसेच गायरानाच्या जमिनींवर बांधण्यात आलेल्या शेकडो घरांना तहसीलदार कार्यालयाकडून नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. केलेले अतिक्रमण शासनाच्या कोणत्याही धोरणानुसार संरक्षित होत असेल तर त्यासंबंधीची कागदपत्रे तीस दिवसांत सादर करा, अन्यथा अतिक्रमणे हटवण्यात येतील, असे या नोटिसांमध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ऑगस्ट २०२२ मध्ये राज्य सरकारने सर्वांसाठी घरे या योजनेत बेघरांनी निवासी प्रयोजनासाठी शासकीय जमिनी तसेच गायरानाच्या जमिनींवर केलेली अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय घेतला आहे; परंतु मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या एका याचिकेवर न्यायालयाने गायरान जमिनींवर झालेली सर्व अतिक्रमणे निष्कासित करण्याचे आदेश ऑक्टोबर २०२२ मध्ये दिले आहेत. या वर्षअखेर ही अतिक्रमणे हटवायची आहेत. शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे हटवण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले आहेत. त्यानुसार उत्तनमधील चौक, डोंगरी, पाटे बंदर, तसेच धावगी येथे असलेल्या शासकीय जमिनी, तसेच गायरानाच्या जमिनींवर बांधण्यात आलेल्या शेकडो घरांना अतिरिक्त तहसीलदारांनी नोटिसा बजावल्या आहेत.

### अतिक्रमण स्वतःहून काढावे

शासकीय जमीन व गायरानावर झालेले अतिक्रमण शासनाच्या कोणत्याही धोरणानुसार अथवा तरतुदीनुसार संरक्षित होत असेल तर त्यासंबंधीची कागदपत्रे अतिरिक्त तहसीलदार कार्यालयात नोटीस मिळाल्यापासून तीस दिवसांत सादर करण्यात यावीत. ही कागदपत्रे नमूद कालावधीत सादर न केल्यास झालेले अतिक्रमण नोटीस मिळाल्यापासून साठ दिवसांत काढून टाकावे व जमिनीचा ताबा महसूल विभागाकडे द्यावा. तसे न केल्यास हे अतिक्रमण शासकीय खर्चाने हटवण्यात येईल व त्याचा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल, असे या नोटिसांमध्ये नमूद करण्यात आले आहे. या नोटिसा मिळाल्यानंतर रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### पुन्हा नोटिसा कशासाठी?

२०१० मध्येदेखील अशा प्रकारच्या नोटिसा गावकऱ्यांना देण्यात आल्या होत्या. मात्र त्यानंतर गायरानच्या जमिनींवरील अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. दुसरीकडे सरकारी जागेवरील २००० पर्यंतची अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे. असे असताना उत्तन परिसरात पिढ्यानपिढ्या असलेल्या जुन्या घरांना पुन्हा नोटिसा कशासाठी बजावण्यात आल्या आहेत, असा सवाल मच्छीमारांचे नेते बर्नड डिमेलो यांनी उपस्थित केला आहे.

CS CamScanner

सकाळ -पु. पा. नं. २

## शरद पवार यांचा भाजपला टोला; महाविकास आघाडीला बळ मिळणार

# फोडाफोडीच्या राजकारणाला चपराक

सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता.१३: "जनतेने भाजपच्या विरोधात काठावरचा कौल दिला तर केंद्रातील सत्ता आणि यंत्रणा यांचा वापर करून दुसरे पक्ष फोडून सत्ता स्थापन करण्याचे प्रकार भाजपने केले. याचाच राग म्हणून आज कर्नाटकच्या जनतेने भाजपला सपशेल नाकारत काँग्रेसला बहुमतापेक्षाही अधिक जागी विजयी करून भाजपच्या फोडाफोडीच्या राजकारणाला चपराक दिली," असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी शनिवारी लगावला.

कर्नाटक विधानसभा निवडणूक निकालानंतर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, अलीकडच्या काळात भाजपने जिथे त्यांचे राज्य नाही त्याठिकाणचे आमदार फोडून तेथील राज्य घेण्याचा प्रयत्न चालवला आहे. त्यासाठी सत्तेचा वापर करणे हे सूत्र त्यांनी ठिकठिकाणी वापरले. कर्नाटकातसुद्धा त्यांनी हाच प्रयोग केला. कर्नाटकात जे काँग्रेस आणि जनता दलाचे सरकार होते ते सरकारही काँग्रेसचे आमदार फोडून घालवले. जसे महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांनी केले तेच कर्नाटकमध्ये झाले होते. मध्य प्रदेशातही आमदार फोडून कमलनाथ यांचे सरकार पाडण्यात आले. गोव्यातही भाजपने तेच केले. यंत्रणा आणि साधनसंपत्ती वापरून सरकार पाडण्याची ही एक नवीन पद्धत सुरु झाली आहे, ही गोष्ट चिंताजनक आहे. मात्र, फोडाफोडी आणि खोक्यांचे राजकारण लोकांना पसंत नाही, ही गोष्ट कर्नाटकच्या निकालाने दाखवून दिली.

"कर्नाटकमध्ये काँग्रेसला भाजपपेक्षा दुप्पट जागांवर यश आले आहे. याचा अर्थ भाजपचा सपशेल पराभव करण्याची भूमिका कर्नाटकच्या जनतेने घेतली. याचे मुख्य कारण म्हणजे भ्रष्टाचार, सत्तेचा, साधनांचा गैरवापर आणि लोक फोडून आपण राज्य करू शकतो, याविषयी सत्ताधाऱ्यांना असलेल्या विश्वासाविरोधात जनतेमधून तीव्र प्रतिक्रिया उमटली," असे पवार यांनी स्पष्ट केले. देशामध्ये ज्या पद्धतीने धर्म आणि जातींच्या नावाने चुकीचे वातावरण पसरवणाऱ्या प्रवृत्ती आहेत त्यांना कर्नाटकच्या जनतेने आज धडा शिकवला, असा टोला लगावत आता ही प्रक्रिया संबंध देशात होईल. असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला.

देशात २०२४ मध्ये लोकसभा निवडणुका होतील तेव्हा देशात काय चित्रे असू शकते, याचा अंदाज कर्नाटकच्या निवडणुकीतून करू शकतो. कर्नाटकच्या निवडणुकीत राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो यात्रे'चा उपयोग झाला असे म्हणता येईल, असेही पवार यांनी स्पष्ट केले.



### मविआची दोन दिवसांत बैठक

कर्नाटकच्या निकालानंतर राज्यातील भाजपविरोधी महाविकास आघाडीला बळ आल्याचे चित्र आहे. याबाबत बोलताना शरद पवार म्हणाले की, महाराष्ट्रात आमच्या पक्षाची बैठक बोलवली. मी स्वतः उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन याविषयी चर्चा करणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस व उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना असे आम्ही एकत्र बसून पुढची आखणी आतापासूनच करावी, हा विचार माझ्या मनात आहे. त्याबाबत मी सर्वांशी बोलणार आहे. दोन दिवसांनतर आम्ही महाविकास आघाडीची एकत्रित बैठक घेऊन आगामी रणनितीबाबत चर्चा करू, असे पवार यांनी सांगितले.

सकाळ पा. न. ५

## नालासोपाऱ्यात बंद दुकानांना आग

नालासोपारा, ता. १३ (बातमीदार) : नालासोपाऱ्यात बंद गाळ्यांना भीषण आग लागल्याने आतील सामान जळून खाक झाले. नालासोपारा पूर्वेकडील श्रीराम नगर, सागपाडा परिसरात शनिवारी (ता. १३) दुपारी साडेतीनच्या सुमारास ही घटना घडली आहे. वसई-विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळावर पोहचून आगीवर नियंत्रण मिळवले.

CamScanner

पुढारी पा. नं. ८

## मान्सूनपूर्व नालेसफाईकडे होतेय दुर्लक्ष

**विरार :** पावसाळा जवळ येत असताना वसई-विरार शहर महापालिकेच्यावतीने शहरातील नालेसफाईकडे होत असलेलं अक्षम्य दुर्लक्ष जनतेसाठी पावसाळ्यात त्रासदायक ठरणार असल्याचे चित्र आहे. मे महिना मध्यावर आला असताना महापालिकेने शहरात केवळ २२ टक्के नालेसफाई पूर्ण केली असून उर्वरित ७८ टक्के नालेसफाई अवघ्या दोन आठवड्यात कशी पूर्ण होणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. वसई- विरार शहर महापालिका क्षेत्रातील मोठ्या प्रमाणातील अतिक्रमण, पावसाळी पाणी वाहून नेणार्या नाल्यांमध्ये झालेली अतिक्रमणं यामुळे पावसाळी पाणी वाहून नेणारे मार्ग बंद झाले आहे. नैसर्गिक मार्ग बंद झाल्याने पावसाच पाणी शहरात साचते. अनेक भागात नागरिकांच्या घरांमध्ये, औद्योगिक व वाणिज्यिक आस्थापना यात पुराचं पाणी साचल्याने जनजीवन विस्कळीत होते. पावसाळी पाणी वीजपुरवठा करणाऱ्या क्षेत्रात साचल्यामुळे सलग दीर्घ काळ वीज पुरवठा खंडित राहतो. वाहतूक व्यवस्था विस्कळीत होते. एकूणच नागरी जीवन उद्ध्वस्त होण्याचा मागील काही वर्षातील वाईट अनुभव पाठिशी असतानाही महापालिकेचं प्रशासन नालेसफाईची असंवेदनशीलता क्लेशदायक स्वरुपाची आहे.

लोकमत पु. पा. नं. १

## आरोपीस सहा तासांत अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पूर्व भागात घरफोडी करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी सहा तासांत अटक केल्याची माहिती मीरा-भाईंदर परिमंडळ १ चे पोलिस उपायुक्त जयंत बजबळे यांनी दिली.

साई सरोवर इमारतीत राहणारे धीरज त्रिभुवन परमार हे जोगेश्वरी येथे नातेवाइकांकडे तर पत्नी मनीषा या लग्नासाठी कल्याणला गेल्या होत्या. दुसऱ्या दिवशी त्यांची मोलकरीण झाडांना पाणी घालण्यासाठी आणि साफसफाईसाठी गेली असता बेडरूममधील सामान अस्ताव्यस्त पडलेले आणि लोखंडी कपाट उघडे असल्याचे दिसले. तिने लागलीच परमार यांना कॉल करून कळवले. त्यानंतर कपाटातील तिजोरी तोडून त्यातील २ लाख ६५ हजार रोख रक्कम चोरीला गेल्याप्रकरणी ११ मे रोजी नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. सहायक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय पवार, निरीक्षक सुशीलकुमार शिंदे, सहायक निरीक्षक योगेश काळे यांच्या पथकाने मीरा-भाईंदरमधील सीसीटीव्ही फुटेजसह विटावापर्यंतचे सीसीटीव्ही तपासले. त्यावरून चेतन प्रकाश मोकाशी (रा. विटावा) याला माजीवडा भागातून ११ मेच्या रात्री अटक केली.

CS CamScanner

1997 से

# KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्ष: 26 अंक-329 मुंबई, रविवार 14 मई 2023 पृष्ठ-12 मूल्य: 2.00

# दोस्त की हत्या कर तमिलनाडु से फरार हत्यारा 5 साल बाद वसई से गिरफ्तार

**वसई:** दोस्त की हत्या कर तमिलनाडु राज्य के चेन्नई शहर से फरार होने वाला एक भूमिगत आरोपी को 5 साल बाद वालीव पुलिस स्टेशन की अपराध जांच ने गिरफ्तार करने में सफलता पाई है।यह सफलता परिमंडल 2 डीसीपी पोर्णिमा चौगुल-श्रींगी व एसीपी चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन में वालीव थाने के सीनियर पीआई कैलाश बर्वे व पो.नि.श्री. राहुलकुमार पाटील (क्राइम) के नेतृत्व में अपराध जांच शाखा के स.पो.नि.ज्ञानेश फडतरे की टीम ने पाई है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने शनिवार को दी है।पुलिस ने बताया कि तमिलनाडु राज्य स्थित ताम्बरम सिटी,चेन्नई, टी-19 केलमबक्कम पुलिस स्टेशन में दर्ज कलम 302 के तहत संदिग्ध आरोपी रघू दुघई मंडल,निवासी-बिहार का तमिलनाडु पुलिस पिछले 5 साल से लगातार इसकी तलाश कर रही थी।आरोपी को खोजने के लिए तमिलनाडु पुलिस ने बिहार राज्य में कई बार तलाशी अभियान चलाया।लेकिन आरोपी में तमिलनाडु पुलिस रघु मंडल को नहीं ढूंढ पाई।पुलिस ने बताया कि 11 मई, 2023 को तमिलनाडु राज्य पुलिस की एक विशेष टीम ने संदिग्ध आरोपी रघु दुघई मंडल की तलाश के लिए वालीव पुलिस स्टेशन में प्रवेश किया।तदनुसार,वालीव पुलिस स्टेशन के अपराध का पता लगाने वाली टीम के अधिकारियों और कर्मचारियों ने संदिग्ध आरोपी में से रघु दुघई मंडल का पता लगाने के लिए तमिलनाडु पुलिस से जानकारी एकत्र की,साथ ही वालीव थाने के अपराध जांच शाखा के अधिकारियों व कर्मचारियों ने अपने मुखबिरों के नेटवर्क को सक्रिय किया और मुखबिरों द्वारा दी गई जानकारी के आधार पर आरोपी रघु मंडल के वसई स्थित एक बफिंग कंपनी में काम करने की सूचना मिली,बाद में अपने दोस्त की हत्या के मामले में आरोपी रघु मंडल को वालीव पुलिस ने सफलतापूर्वक गिरफ्तार कर लिया। पुलिस ने बताया कि आरोपी रघु मंडल पर की गई जांच के दौरान आरोपी रघु मंडल और



उसका दोस्त अनिल चौधरी ताम्बरम के टी-19 केलमबक्कम थाने में एक बफिंग कंपनी में साथ काम करते थे और एक ही कमरे में एक साथ रहते थे.लेकिन आखिरकार, रघु मंडल और उनके दोस्त अनिल चौधरी ने छोटी-छोटी बातों पर झगड़ा किया और वे आपस में झगड़ पड़े।उक्त झगड़े से रघु मंडल नाराज हो गया और 14 सितंबर 2018 की रात करीब 09:00 बजे जब अनिल चौधरी रघु मंडल के साथ रात में एक ही कमरे में सो रहा था तो रघु मंडल ने तेज चाकू से अपने दोस्त अनिल चौधरी का गला काट कर हत्या कर दी. इसके बाद आरोपी रघु मंडल ने अनिल चौधरी के शव वाले कमरे को बाहर से बंद कर दिया और फरार हो गया। तमिलनाडु पुलिस को हत्या के मामले की जांच के दौरान रघु मंडल द्वारा किए गए अपराध का सीसीटीवी फुटेज मिला था। इसके मुताबिक तमिलनाडु पुलिस रघु मंडल की तलाश कर रही थी.

# किशोर अवारे के हत्यारे को पुणे पुलिस ने किया गिरफ्तार

**पुणे:** जनसेवा विकास समिति के अध्यक्ष किशोर अवारे के हत्यारे को पुणे पुलिस क्राइम ब्रांच के रंगदारी रोधी दस्ते ने कारवेनगर से गिरफ्तार कर लिया है.तलेगांव दाभाडे के किशोर अवारे हत्याकांड के आरोपी संदीप विठ्ठल मोरे के बारे में रंगदारी रोधी दस्ते को सूचना मिली कि संदीप विठ्ठल मोरे वर्तमान में करवेनगर पुणे में छिपा हुआ है. सूचना मिलते ही वरिष्ठ पुलिस निरीक्षक प्रताप मानकर की टीम निजी वाहन से उक्त स्थान पर गए और संदीप विठ्ठल मोरे को हिरासत में ले लिया.

यह कार्वाई पुलिस आयुक्त रितेश

CS CamScanner

# तमिलनाडु से हत्या करके भागा हत्यारा वसई से गिरफ्तार

प्रात:काल संवाददाता

मुंबई। वालीव पुलिस टीम ने ह सालों से फरार चल रहे मित्र के त्यारे को गिरफ्तार किया। पुलिस त्रों के अनुसार 5 साल पहले रोपी और मृतक दोनों में मामूली वाद को लेकर झगड़ा हुआ ,बात इतनी बढ़ गयी कि दोस्त को पने ही दोस्त की हत्या कर मौके से ग गया। आखिरकार चेन्नई ने लीव पुलिस कि मदद से हत्यारे को सई धरदबोचा।

प्राप्त जानकारी के अनुसार वर्ष )18 में तामिलनाडू राज्य के चेन्नई थत तम्बरम शहर के टी 19 लमबक्कम पुलिस थाने में अनिल धरी नामक व्यक्ति की हत्या करने मामला दर्ज किया।इस हत्याकांड हत्यारा कोई और नही मृतक का स्त रघू दूधई मंडळ बिहार निवासी



द्वारा की गयी थी। केलमबक्कम पुलिस हत्यारे को ढूंढ रही। 14 सितंबर 2018 को दोनों ने रात का खाना साथ खाया और सो गए। कुछ देर बाद रघु उठा और धारदार चाकू से गहरी नींद में सो रहे अनिल चौधरी का गला रेतकर उसकी हत्या कर दी। जाते समय उसे रूम को बाहर से लॉक कर दिया था।जब हत्या की खबर पुलिस को मिली तो पुलिस ने हत्या का मामला दर्ज कर हत्यारे रघू दूधई मंडळ की खोजबीन शुरू कर दी। लेकिन तामिलनाडु पुलिस को शुरुआती जाँच में घटनास्थल के आसपास लगे सीसीटीवी कैमरे से मिले फूटेज से छानबीन किया लेकिन कुछ भी हाथ नही लगा। पिछले पांच सालों से पुलिस ने बिहार ,यूपी आदि राज्यों में तलाश अभियान चलाया । हत्यारा रघू दूधई मंडळ एक बफिंग वर्कर था और वसई के वालीव क्षेत्र स्टील इंड्रस्टीयल ऐरिया है ।यहां हजारों की संख्या में बफिंग कंपनियों है। इस बात पर वालीव पुलिस ने अपनी जांच शुरू कर दिया।इस बीच वालीव पीआय कैलास बर्वे को गुप्त सूचना मिली के एक संदिग्ध व्यक्ति पिछले कुछ महीनों से एक बफिंग कंपनी में रह रहा है। इस पर क्राईमपीआय राहुल पाटील के मार्गदर्शन में पुलिस टीम ने उस कंपनी के आसपास जाल बिछाकर संदिग्ध ( रघू दूधई मंडळ )की गतिविधियों पर नजर रखी। उसके बाद पक्की जानकारी हासिल कर रघू दूधई मंडळ धरदबोचा और पुलिस स्टेशन लाया। पूछताछ करने पर उसे पुलिस को गुमराह करने की कोशिश की लेकिन एक नही चली और हत्या करने की बात कबूली । पुलिस ने हत्यारे को गिरफ्तार कर केलमबक्कम पुलिस थाने की टीम को सौप दिया है।

CS CamScanner

समय भास्कर

# आर.एन.पी. पार्क में हुई लाखों की चोरी

## नवघर पुलिस ने आरोपी को महज 6 घंटे में किया गिरफ्तार

पंकज दुबे /मीरा-भाईंदर

नवघर पुलिस स्टेशन के क्राइम ब्रांच यूनिट ने 265000 नगद की चोरी करने वाले को 40 वर्षीय आरोपी को ठाणे से गिरफ्तार कर लिया है 7 भायंदर पूर्व, आरएनपी पार्क परिसर के रहिवासी धीरज परमार ने नवघर पुलिस स्टेशन में एक चोरी का मामला दर्ज कराया, उन्होंने बताया कि अज्ञात व्यक्ति ने उनके घर में घुसकर चोरी को अंजाम दिया, उस वक्त घर में कोई नहीं था पुलिस ने धारा 457, 454, 380 के तहत मामला दर्ज कर लिया 7 परिमंडल-1 के पुलिस उपायुक्त जयंत बजबले ने प्रेस वार्ता में बताया कि चोरी का आरोपी फ्लैट लेने के बहाने शिकायतकर्ता से मिला और जान-पहचान बनाई, उसने घर की चाबी चुरा ली, और जब शिकायतकर्ता किसी काम से घर से बाहर थे, तभी वह घर मे घुसा, उसने कटर की मदद से घर की अलमारी काटकर 265000 रुपये नगद पर अपना हाथ साफ कर दिया 7 उसकी नजर परिवार की गतिविधियों पर पहले से ही थी गुप्त सूचना, तकनीकी और सीसीटीवी की मदद से पुलिस आरोपी तक पहुंचने में कामयाब हो गयी, नवघर पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक विजय पवार और उनकी टीम ने इस आरोपी को महज 6 घंटे में ठाणे से 11 मई को गिरफ्तार कर लिया, पुलिस चोरी में गए सभी रकम को भी बरामद कर लिया है 7 यह कार्य परिमंडल-1 के पुलिस उपायुक्त जयंत बजबले, सहायक पुलिस आयुक्त शशिकांत भोसले के मार्गदर्शन में नवघर पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक विजय पवार, क्राइम ब्रांच के पुलिस निरीक्षक सुशील कुमार शिंदे, सहायक पुलिस निरीक्षक योगेश काले, पुलिस उप निरीक्षक अभिजीत लांडे, पुलिस हवलदार भूषण पाटील, सुरेश, नवनाथ, आदि ने किया।



CamScanner

लोकमत

# वसईतून पिस्तूल, जिवंत काडतुसे जप्त

## खैरपाड्यातून एकाला घेतले ताब्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसईत एकाकडून पिस्तूल व जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

खैरपाडा येथे शब्बीर सुलतान खान याच्या ताब्यात वालीव पोलिसांना गुरुवारी रात्री नऊच्या सुमारास एक पिस्तूल, रिकामी मॅक्झिम, १६ जिवंत काडतुसे, शस्त्र परवाना व मोबाईल असा ७० हजाराचा मुद्देमाल आढळून आला होता. वालीव पोलिसांनी




शस्त्र अधिनियम कलमाखाल गुन्हा दाखल केला आहे. इतक्य मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठ सापडल्याने नागरिकांमध्य भीतीचे वातावरण आहे. त पोलिसांनीही खबरादारी तपा सुरू केला आहे.



CS CamScanner

लोकमत

# 'त्या' नंबरवरुन कॉल येत असेल तर व्हा सावध

## पोलिसांचे आवाहन: व्हॉट्सॲप कॉल स्कॅम

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** आजच्या दैनंदिन जीवनामध्ये आपण सगळेच एकमेकांसोबत संवाद साधण्याकरिता व्हॉट्सॲपचा वापर मोठ्या प्रमाणावर करत आहोत. हीच गोष्ट लक्षात घेऊन सायबर गुन्हेगार वेगवेगळ्या क्लुप्त्यांचा वापर करून व्हॉट्सॲपद्वारे नागरिकांना गंडा घालू लागले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने व सध्या सुरू असणारा प्रकार म्हणजे हे सायबर गुन्हेगार ८४, ६२, ६०, ९२ अशा नंबरने सुरुवात असलेल्या आंतरराष्ट्रीय नंबरवरून (मलेशिया, केन्या, व्हिएतनाम, इथिओपिया) कॉल करून नागरिकांची फसवणूक करीत आहेत. अशा प्रकारांमध्ये कॉल उचलल्यास काही ना काही कारण करून लिंक, फोटोज, व्हिडीओ क्लिक करून रेटिंग अथवा काही पैसे मिळतील, असे आमिष दाखविले जाते. परंतु, अशा लिंक, फोटोज, व्हिडीओच्या मागे माल्वेअर (व्हायरस) असल्यास आपल्या मोबाइलमधील डेटा शेअर होऊन आपली फसवणूक होऊ शकते, हे लक्षात ठेवण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

पोलिस आयुक्तालयाच्या सायबर गुन्हे कक्षाकडून नागरिकांना फसवणुकीपासून सावध राहण्याबाबत जाहीर आवाहन करण्यात आले आहे. ठरावीक नंबरने सुरुवात असलेल्या व्हॉट्सॲप नंबरचे कॉल / व्हिडीओ कॉल रिसीव्ह करू नये अथवा चॅटिंग



तरी अशा प्रकारे होणाऱ्या फसवणुकीबाबत सतर्क राहावे. तसेच कोणाचीही अशा प्रकारे फसवणूक झाल्यास तत्काळ नजीकच्या पोलिस ठाण्यात किंवा सायबर गुन्हे कक्षात संपर्क साधावा, असे आवाहन मीरा भाईंदर, वसई - विरार शहरातील नागरिकांना सायबर गुन्हे कक्ष, पोलिस आयुक्तालयातर्फे करण्यात आले आहे.

करू नये. आपल्या व्हॉट्सॲपवर टू स्टेप व्हेरिफिकेशन सेटिंग अनेबल करून ठेवा. अनोळखी व्हॉट्सॲप वरून आलेल्या लिंक, फोटोज व्हिडीओजवर क्लिक करू नका. आपल्या व्हॉट्सॲपच्या सिक्युरिटी कोडची मागणी केल्यास तो कोणासही देऊ नका.

बँकेच्या कार्डचा तपशिल, पिन ओटीपी, पासवर्ड इत्यादी वैयक्तिक किंवा आर्थिक माहिती कोणासोबत शेअर करू नका. कोणतीही बँक, सीम मोबाइल कंपनी, गॅस वितरण एजन्सी इलेक्ट्रीसिटी व्हॉट्सॲपवर ग्राहकांची माहिती मागत नाहीत, असे पोलिसांनी स्पष्ट करून सांगितले आहे.



CamScanner